# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

दिनांक : २९/०७/२०२०

## प्रेस नोट

**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे अस्थापनेवर कार्यरत असलेले ३ पोलीस अधिकारी यांना सलग दोन वर्षे नक्षलवाध्यांविरुध्द केलेल्या उल्लेखनिय कामगिरीबद्दल केद्रिंय गृह विभाग,भारत सरकार तर्फे देण्यात येणारे आंतरिक सुरक्षा सेवा पदक जाहिर झाले बाबत.**

आज दिनांक २९/०७/२०२० रोजी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या प्रागंणात ३ पोलीस अधिकारी यांना **सलग दोन वर्षे नक्षलवाध्यांविरुध्द अती दुर्गम भागात केलेल्या उल्लेखनिय कामगिरीबद्दल केद्रिंय गृह विभाग,भारत सरकार तर्फे सन २०१५ मध्ये जाहिर करण्यात आलेले "आंतरिक सुरक्षा सेवा पदक"** मिळाल्याबद्दल मा.संदीप बिष्णोई पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, यांच्या हस्ते सर्व पदक विजेत्यांचा सत्कार करण्यात आला. या विजेत्यांमध्ये,

१) **श्री.अभिजीत मधुकर जाधव** (सहायक पोलीस निरीक्षक) नेमणुक - चिंचवड पोलीस ठाणे
२) **श्री.तानाजी शंकर भोगम** (सहायक पोलीस निरीक्षक) नेमणुक - वाकड पोलीस ठाणे
३) **श्री.नारायन आश्रुबा मिसाळ** (सहायक पोलीस निरीक्षक) नेमणुक- भोसरी वाहतुक विभाग

या अधिकाऱ्यांचा समावेश आहे. सर्व पदक विजेते अधिकारी हे सन २०१० ची महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत घेण्यात येण्यारी पोलीस उप-निरीक्षक ही परीक्षा पास होवुन महाराष्ट्र पोलीस दलात रुजु झाले असुन त्यांनी **ऑक्टोबर २०११ ते ऑगष्ट २०१४ अशी सलग दोन वर्षे गडचिरोली जिल्ह्यात भामरागड, मुलचरा व चामोर्शि या नक्षलग्रस्त भागात नक्षलवाध्यांविरुध्द उल्लेखनिय कामगिरी केली आहे. या अनुषंगाने केद्रिंय गृह विभाग, भारत सरकार यांचे सन २०१५ मध्ये जाहिर करण्यात आलेले आंतरिक सुरक्षा सेवा पदक मिळाल्याबद्दल** बक्षिस प्रदान कार्यक्रम प्रसंगी मा. संदीप बिष्णोई पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी सर्व पदक विजेत्या अधिकारी यांचे अभिनंदन करुन, यापुढेही आपण सर्व जणं अशीच उत्तम कामगीरी करुन पोलीस दलाचे नाव उंचवावे पोलीस दलात उत्कृष्ठ कार्यकरुन पुढे जावुन राष्ट्रपती पदक मिळवण्याचा प्रयत्न करावा असे गौरवोद्गार काढुन त्यांचे कौतुक केले.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा.राखीव पोलीस निरीक्षक श्री.राजकुमार माने यांनी केले या प्रसंगी मा. पोलीस आयुक्त श्री.संदीप बिष्णोई यांचेसह अप्पर पोलीस आयुक्त श्री.रामनाथ पोकळे व पोलीस उप-आयुक्त, गुन्हे श्री. सुधीर हिरेमठ यांनी देखील पदक विजेत्यांचे कौतुक करुन मार्गदर्शन केले.

**सदर या छोटेखानी कार्यक्रम प्रसंगी सोशल डिस्टन्सींगचे तंतोतंत पालन करण्यात आले होते.**


Pimpri Chinchwad Police Commissionerate
Celebrates





